# जाहीर नोटीस ( दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करण्यात येते की, जिल्हा क्षयरोग कार्यालयामार्फत राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम अंतर्गत सन २०२५-२०२६ मंजूर कृती अराखडयानुसार लेखाशिर्ष FMR Code No 73.3, Sample Transportation अंतर्गत जिल्हा क्षयरोग केंद्र, नाशिक येथिल एम.डी.आर पेंशटचे थुंकी नमुणे तपासणी कामी नाशिक ते टी.बी.चेस्ट हॉस्पिटल, औंध, पुणे (आय आर एल, पुणे) येथे पाठविणेकामी कुरीअर दरपत्रक मागविण्याचे निश्चित केले आहे. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी व्यापारी लिफाफा व खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत जिल्हा क्षयरोग कार्यालय, सिव्हिल हॉस्पिटल आवार, त्र्यंबकरोड, नाशिक- ४२२००२ येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी तसेच उपरोक्त इ.मेल द्वारे दरपत्रक, सादर केलेचे अवगत करावे. मोहरबंद तांत्रिक व व्यापारी लिफाफा स्वतंत्र सादर करण्यात यावा.

## दरपत्रके सादर करणाऱ्यां पुरवठाधारकांसाठी सर्वसाधारण अटी शर्ती

१) इच्छुक पुरवठाधारकांनी बाबनिहाय (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत. यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे. त्याचे नांव असावे.

२) एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबंधाचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकरण्यात येतील. उदा. जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी / प्रकल्पासाठी / निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती ज " कंपनी एक्स " चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्या भागधारक असेल तीच व्यक्ती " कंपनी एक्स " चा मालक / संचालक / भागिदार / बहुसेख्य भागधारक नसावी.

३) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड ची छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

४) संस्था / दुकान, साहित्य पुरवठा / विक्रि विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडावा.

५) दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता / ठिकाण - जिल्हा क्षयरोग कार्यालय, सिव्हिल हॉस्पिटल आवार, त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२००२ .

६) जिल्हा क्षयरोग कार्यालय, नाशिक ते टी.बी.चेस्ट हॉस्पिटल, औंध, पुणे (आय आर एल, पुणे) येथे पाठविणेकामी कुरीअर दरपत्रके सादर करावी.

७) विहीत कालावधीत सुविधा न मिळाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

८) विहीत नमुन्यातिल वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील, दर हे सर्व करांसहीत व उचल ठेव इमाली पोहच खर्चासहीत असावे.

९) दरपत्रक पोहच जिल्हा क्षयरोग कार्यालय, नाशिक येथे करावी लागेल.

१२) दर हे अधिकतम विक्री किंमतीपेक्षा (MRP) जास्त नसावे. वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना शासन निर्णय,परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१३) इच्छुक पुरवठाधारकास कोणत्याही शासकीय विभागाने खरेदी प्रक्रियेसाठी काळया यादीत

Scanned with OKEN Scanner

टाकेले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१४) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासून आठ दिवस संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल (कार्यालयीन सुटटी वगळून) उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१५) दरपत्रके उघडण्याची अंतिम मुदतिच्या (आठव्या दिवशी) संध्याकाळी ५.१५ वा किंवा याकार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१६) दरपत्रकासोबत सादर करण्यात येणारे दस्तावेज (कागदपत्रे) राजपत्रित अधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन सादर करावे.

१७) कोणतेही लेखी तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवाकाही भागांबाबत (काही वस्तुंबाबत) खरेदी प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे व खरेदीचे सर्व अधिकार जिल्हा क्षयरोग अधिकारी नाशिक यांनी राखुन ठेवले आहेत. मान्य न्युनतम दर एक वर्षासाठी वैध राहतील.

जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र, नाशिक

प्रत – सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव सविनय सादर

Scanned with OKEN Scanner